# जमाना बदलल्याचं चिन्हं दुसरं काय?

- प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
(सागर)



# जमाना बदलल्याचं चिन्ह दुसरं काय?

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# जमाना बदलल्याचं चिन्ह दुसरं काय?

या पुस्तकातील कवितांचे सर्व हक्क कवी प्रकाश क्षीरसागर यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २५ ऑगस्ट २०१९

©esahity Pratishthan®2019

- हे पुस्तक विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही श्री प्रकाश क्षीरसागर यांचे आभारी आहोत.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

ग्रामीण कवितेला बहर आला तो प्रामुख्याने १९६० नंतर. अनेक नव्या दमाचे प्रतिभावंत कवी आपला अस्सल ग्रामीण जीवनानुभव विविध अंगाने आणि विविध ढंगाने व्यक्त करू लागले. ग्रामीण सर्जनशीलतेला स्वाभाविकता आणि सहजतेचे वरदान लाभलेले असल्याने जुळाऱ्यांच्या करामतीतून आणि तत्संबंधी अनुकरणापासून ती पूर्णपणे अलिप्त राहिली आहे. ही अलिप्तता हेच ग्रामीण कवितेचे वैभव आणि मोठेपण आहे. अनुभवातील सकसपणा, जिवंतपणा तितक्याच ताकदीने, उत्स्फूर्तपणे व्यक्त झाला तर ती कविता किती सच्ची नि सरस होते, हे आजवर अनेक ग्रामीण कवींच्या कवितांनी दाखवून दिले आहे. अशा अस्सल सर्जनशीलतेचे लेणे लेऊन आणि देणे उराशी बाळगून 'राठी काव्यक्षेत्रात वावरणारा कवी म्हणजे **प्रकाश रामचंद्र क्षीरसागर** हा होय.

त्यांची कविता स्वयंसिद्ध अशी आहे. तिचा स्वतःचं असं रंगरूप आहे, चेहरा-मोहरा आहे. कुठल्याही कवीचा वा काव्यसंप्रदायाचा प्रभाव किंवा अनुकरणाची छाप त्यांच्या कवितेत थोडीशीही जाणवत नाही. या संदर्भात कवीच एका कवितेत म्हणतो, *'माझ्या मनाच्या आर्त स्वरातच सदा गात गेलो'* हा आर्त स्वर खरोखरचं सच्चा आहे.

आपलं वेगळेपण जपण्याचा प्रत्येक कवी आपापल्या परीने प्रयत्न करतो पण वेगळेपण याचा अर्थ पूर्वपरंपरांना पूर्णतः तिलांजली देणं असं नव्हे. संतसूर्य तुकारामांपासून डॉ. आनंद यादवांपर्यंतच्या मराठी ग्रामीण कवितेला अनेकांचं वैशिष्ट्यपूर्ण योगदान आहे.

एकविसाव्या शतकातील जीवनाचं कृषिकेंद्रित अशा ग्रामजीवनाचं विविधांगी आणि अर्थपूर्ण दर्शन घडविणाऱ्या प्रकाश क्षीरसागर यांच्या कवितेची भाषा नागरसन्मुख आहे.

**– प्रा. श्रीकृष्ण अडसूळ**, मडगाव

मा. रा. प्र.
माधव राघव प्रकाशन
ताळगाव – गोवा

# जमाना बदलल्याचं चिन्हं दुसरं काय?


प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
(सागर)



मा. रा. प्र.
माधव राघव प्रकाशन
ताळगाव – गोवा

**जमाना बदलल्याचं चिन्हं दुसरं काय ?**
(कवितासंग्रह)

**Jamana Badalalyach Chinh Dusar kay?**
(Collection Of Poems)

---

**सागर**
**(प्रकाश रामचंद्र क्षीरसागर)**
मोबाईल : ९०११०८२२९९ / ७९७२०९०१९
अर्नेस्टिना को ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी
बी - एस - दोन, थोरले भाट, ताळगाव
पोस्ट करंझाळे, गोवा पिन - ४०३००२

प्रकाशक :
**माधव प्रकाश क्षीरसागर**
**माधव राघव प्रकाशन**
अर्नेस्टिना को ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी
बी - एस - दोन, थोरले भाट, ताळगाव
पोस्ट करंझाळे, गोवा पिन - ४०३००२

मुखपृष्ठ :
**दिलीप दारव्हेकर,** (आखाडा बाळापूर)
(८३०८५४१७२७)

अक्षर जुळणी व मुद्रक
**लोकमान्य प्रोसेस,** खोर्ली, तिसवाडी गोवा

**मोल : ₹ १५०/-**

---

**या पुस्तकाला गोवा राज्य कला आणि संस्कृती संचालनालयाच्या 'लेखकास प्रकाशनार्थ अनुदान' योजनेतून अर्थसाहाय्य मिळाले आहे.**

---

## अर्पण पत्रिका

ज्या झाडांनी मला सावली दिली,
नवी उभारी घेण्याची प्रेरणा दिली,
माझी कविता दिली.
त्या झाडांना, शेतीला
या कविता अर्पण.
त्याचप्रमाणे झाडाच्या सावलीप्रमाणेच
माझ्या कवितेवर पाखर घालणाऱ्या
सर्वांनाही...

# व्यथित मनाची घालमेल

कवितेच्या प्रांतात गेल्या अनेक वर्षांपासून माझी मुशाफिरी सुरू आहे. नवनवीन संकल्पना, बदलत्या पिढीचे जीवन, नवीन आणि जुन्या पिढींच्या मनांतील विचारांचा संघर्ष आणि पिढ्यांतर (जनरेशन गॅप), मानवी जीवनावर होणारे बदलत्या जीवनशैलीचे, मुक्त अर्थव्यवस्थेचे परिणाम यांचे चिंतन करताना आढळलेली माणसांची घुसमट व्यक्त करण्यासाठी या कविता जन्म घेत गेल्या. मनातील भावभावनांचे कल्लोळ जपताना मी हरवत जातो. त्यात गुंतत जातो. हळव्या मनाच्या कंगोऱ्यांतून मी जीवनाकडे पाहतो. त्यातून माझ्या कवितांना मोकळे करीत जातो. त्यातूनच निर्माण झालेल्या या कवितांचा संग्रह ***'जमाना बदललल्याचं चिन्हं दुसरं काय'*** या नावानं देताना मला खूप आनंद होत आहे. रसिक वाचक या संग्रहाचे खुल्या दिलाने स्वागत करतील, अशी आशा आहे. या संग्रहात नव्या सहस्रकाची व्यथाही आली आहे. मनाच्या घालमेल आणि विविध विषयांना मी वाट करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

जीवनाचा संघर्ष, ग्रामीण आणि शहरी जीवनातील बदलते जीवनमान, माणसांच्या मनाचे कोवळेपण हरवत चालल्याने भावनांचे हरवत चाललेले स्थान या साऱ्यांमुळे कविताही आता बोथट होऊ लागलीय की काय, अशी शंका माझ्या सारख्या सरळ वाटेने जाणाऱ्या संवेदनशील माणसांना येत आहे. व्यावहारिकता आणि व्यावसायिकता यांच्यांत अडकत चाललेली कविता आता संवेदनाहीन बनत चालल्याचा भास होतो. 'शब्द बापुडे केवळ वारा' असेच आता होऊ लागले आहे की काय, अशी शंका येऊ लागलीय. या साऱ्या कविता अडीच दशकांतील आहेत. म्हणजे नवे सहस्रक आणि गेलेले सहस्रक यांच्या मध्ये घुटमळणारी ही माझी कविता आहे. नावीन्याचा शोध घेतानाच जुन्याची संगत सोडणार नाही, असा बाणा या कविता व्यक्त करतात. म्हणूनच गतकाळात रमणारी मनोवृत्ती (नॉस्टॅलजिया) आणि बदलाच्या वेगात कोण कुठे असेल, याची काळजी माझ्यातल्या कवीला वाटते. मी कधी कधी

भूतकाळात रमतो, संवेदनशीलता अधिक जपणारा मी या नव्या जमान्याच्या जगण्याशी तरीही जुळवून घेतो आणि त्यातून नव्या-जुन्याच्या या कविता येत राहतात. नव्या कविता नव्या पद्धतीने येतात.

या संग्रहात अभंग छंदापासून ते मुक्तछंदापर्यंत सगळ्याच वाटेने जाणाऱ्या कविता आहेत. 'शेतीची आणि शेतकऱ्यांची व्यथा आणि समस्या', 'निसर्ग कविता', 'झाडांच्या कविता' आहेत. झाडांनाही भावना असतात हे भारतीय वैज्ञानिक डॉ. जगदीशचंद्र बोस (बसू) यांनी मागच्या सहस्रकातच सिद्ध केले आहे. झाडांच्या भावनांचा अनुभव मलाही आला होता. ***अजून मोगरीला नाही फूल आले काळजीने बाजूचे झाड का वाळले?*** या कवितेतून तो अनुभव सिद्धही झाला आहे. शेती, पाऊस, दुष्काळाने माझे मन व्यथित होते. मी चिंतित होतो. त्याचा प्रत्यय काही कवितांतून उतरत राहिला.

माझे एक मित्र धारवाड (कर्नाटक) येथील प्रा. अमृत यार्दी हे माझ्या कवितेचे दर्दी रसिक समीक्षक. बेळगाव तरुण भारतच्या अक्षरयात्रा पुरवणीत प्रसिद्ध झालेल्या नवे नवे यमदूत या कवितेवर त्यांनी दूरभाष संदेश दिला. नवे नवे यमदूत ही कविता वाचली पण अर्धवट वाटली. त्यावर मी उत्तर देताना म्हटले की, पण पुढचं वास्तव इतक भयाण आहे. ते मी लिहूच शकलो नाही. ते वाचकावर सोपवतो. आता कुऱ्हाडीचे दांडे झाडांचे नाहीत तर माणसांचेच यमदूत होतील. जगात कित्येक दहशतवादी संघटना माणसांचेच काळ झाल्या आहेत. ते त्याच कुऱ्हाडीने लोकांची मान छाटतात. ही कविता 1999- 2001 च्या काळातील आहे. सावंतवाडीचे डॉ. मधुकर घारपुरे हे रसिकदेखील कविता वाचून अभिप्राय चिकित्सक पद्धतीने देतात. फेसबुकवर आणि सोशल मीडियावर देखील अनेक साहित्यमित्र अभिप्राय देऊन कवितेवर चर्चा करतात. त्यांचा आधार माझ्या कवितेला मिळतोच मिळतो. मी त्यांचा ऋणी राहीन. माझ्या यापूर्वीच्या कवितांवरील अनेक समीक्षकांची मते या संग्रहात मुद्दाम समाविष्ट केली आहेत. त्यामुळे नव्याने माझ्या कवितेशी मैत्रीचा हात पुढे करणाऱ्या रसिकांना माझ्या कवितेची नाडी निश्चित सापडू शकेल. त्या सगळ्या समीक्षकांचा मी ऋणीच राहीन. त्यांच्या मार्गदर्शनातून कवितेला नवी झळाळी मिळाली आहे, हे तितकेच खरे. प्रा. कृष्णाजी कुलकर्णी, काव्यसंध्येतील सगळे मित्र मैत्रिणी, शरद नरेश सारखा कविमित्र

तसेच मोहनराव कुलकर्णी व माधव सटवाणी यांच्या सूचक सल्ल्याने माझी कविता समृद्ध होत आहे. दीपा मिरिंगकर, दया मित्रगोत्री, नलिनी देशपांडे, काव्यमैफलीतील कविता बोरकर, राजेंद्र मेंगाणे, नृपेन, वंदन, सुनंदाताई कांबळे, अभयजी सुराणा (जे माझ्या हिंदी कवितेला नेहमीच दाद देतात.), सुहास बेळेकर यांचा उल्लेख मुद्दाम आवर्जून करतो. जागेअभावी सगळ्यांचा नामोल्लेख करणे शक्य झाले नाही. सौ. चित्रा प्रकाश क्षीरसागर यांच्यासारख्या चिकित्सक, रसिक वाचक व समीक्षक वृत्तीच्या कवयित्री माझ्या जीवनसाथी असल्याने त्यांची टिप्पणी कवितांवर नेहमीच होत असते. त्यामुळे या कविता अधिक लोकाभिमुख होत आहेत. आमची दोन्ही मुले माधव आणि राघव खूप चिकित्सक आहेत. त्यांचे अभिप्रायही कविता लेखनात महत्त्वाचे ठरले आहेत. रसिक वाचकांनी या कवितांच्या प्रातांत रमावे यासाठी नमनाला घडाभर तेल न घालता इथेच थांबतो.

**– सागर**


# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ● | **झाड, निसर्ग, शेती** | **११-४०** |
| १. | झाडं आणि माणसं | १२ |
| २. | झाडे झाली तनामनाची | १३ |
| ३. | सत्याचंच स्वप्न होणारंय | १४ |
| ४. | झाडावर बलात्कार केला | १५ |
| ५. | एक वठलेलं झाड | १६ |
| ६. | झाडांच्या मुळांवर उठलेली माणसं | १७ |
| ७. | क्रौर्याला हुंदके कुठे कळतात? | १८ |
| ८. | नवे नवे यमदूत | २० |
| ९. | कोलाहल | २१ |
| १०. | जगतात झाडे माणसांच्या साठी | २२ |
| ११. | आले जांभळाचे दिस | २४ |
| १२. | पारावरचा लिंब | २६ |
| १३. | पार मूक | २८ |
| १४. | कळ्यांचे श्वास निःश्वास | २९ |
| १५. | हाक चातकाची | ३० |
| १६. | वेदना फुलांच्या | ३१ |
| १७. | पुन्हा एकदा | ३२ |
| १८. | भुईस घोर | ३३ |
| १९. | तक्रार | ३४ |
| २०. | सोस | ३५ |
| २१. | चांदण्यांची कुणकुण | ३६ |
| २२. | पावसाला म्हटलं ये | ३७ |
| २३. | श्वास वाऱ्याचे कोंडले | ३८ |
| २४. | कूस | ३९ |
| २५. | माणसांची खैर नाही | ४० |
| ● | **गेय कविता** | **४१-६८** |
| २६. | मी टाळतो | ४२ |
| २७. | पक्ष्यांचे विसरे गाणे | ४३ |
| २८. | छळतात ही माणसे? | ४४ |
| २९. | भीतीचा पहारा | ४५ |
| ३०. | नदीकिनारी | ४६ |

३१. श्रावण आला ४७
३२. हा किनारा ४८
३३. सुखाची मुजोरी ४९
३४. जपायला हवे ५०
३५. नका ५१
३६. मायेचा नाही फिरला ५२
३७. कसा ५३
३८. येतो वर्षत गर्जत ५४
३९. आषाढ गाणी ५५
४०. इशारे आसवांचे ५६
४१. ते थेंब नभीचे ५७
४२. गेले कुठे ? ५८
४३. गीत वेदनांचे ५९
४४. होता ६०
४५. नववर्ष ६२
४६. सवाल मुलाचा ! ६३
४७. इतके सारे घाईत ६४
४८. जिंदगी ६५
४९. काळोखाचे दीप ६६
५०. चोचीतून किती कळ ६७
५१. मन ६८
● **मुक्तछंद आणि मी विषयक काही कविता ६९–११६**
५२. नक्षत्रांची गाणी ७०
५३. अस्तित्व ७१
५४. डस्टबीन ७२
५५. चालायचंच ७३
५६. जमान बदलल्याचं चिन्ह दुसरं काय! ७४
५७. आपण किती बरे किती खरे? ७६
५८. कबिले ७७
५९. मी एक अस्वस्थामा ७८
६०. आभाळाचे गाणे जगणे ७९
६१. गर्दी भोवतीची ८०
६२. गिनिपिग ८२
६३. वाऱ्याचे बेताल वागणे ८३

| | | |
|---|---|---|
| ६४. | खडकामध्ये न्हात पाखरू | ८४ |
| ६५. | गावाकडे गेलो की | ८५ |
| ६६. | माझ्या गावाच्या भूमीत | ८६ |
| ६७. | वेदनाहीन | ८८ |
| ६८. | कळत नाही ! | ८९ |
| ६९. | कोनवाडा | ९० |
| ७०. | वास्तवाचे कटुत्व | ९१ |
| ७१. | मैना | ९२ |
| ७२. | मी जपतोच वेदना! | ९४ |
| ७३. | मी बंद केलंय! | ९५ |
| ७४. | मी असाच आहे | ९६ |
| ७५. | सुपर स्टोअर | ९७ |
| ७६. | प्रत्येक वेळी मीच | ९८ |
| ७७. | आणि मी दचकतो... | ९९ |
| ७८. | आपण अनभिज्ञ | १०० |
| ७९. | उलटे | १०१ |
| ८०. | प्रत्येक जण असतो इथे विश्वामित्र | १०२ |
| ८१. | सगळे तत्त्वज्ञान कळल्यासारखी | १०३ |
| ८२. | धडपड | १०४ |
| ८३. | निर्धास्त | १०५ |
| ८४. | कविता माझ्या मनीच्या | १०६ |
| ८५. | आजकाल | १०७ |
| ८६. | खळबळ | १०८ |
| ८७. | शिक्षा | १०९ |
| ८८. | आपलेच भागत नाही | ११० |
| ८९. | सही सही | ११२ |
| ९०. | डोळे | ११३ |
| ९१. | झाला मोकळा बाजार | ११४ |
| ९२. | शहर | ११६ |
| ● | **स्त्री जाणिवेच्या कविता** | **११७-१२३** |
| ९३. | इमान | ११८ |
| ९४. | ती | ११९ |
| ९५. | तिचा हक्क | १२० |
| ९६. | सारेच अजब | १२२ |

# झाड, निसर्ग, शेती



१.

## झाडं आणि माणसं

झाडांचं आपलं बरं असतं
त्यांना कुणीच दुश्मन नसतं
माणसांचंही तसंच असतं
त्यांना कुणीच दोस्त नसतं.
परवा परवापर्यंत हीच माणसे
आपल्या लेकी – सुना जाळत
आता ओली झाडं जाळतात
बुंध्यांना आगी शिलगावत
होरपळणारी झाडं तेव्हा
वेदनांनी हसतात, केविलवाणी
तरीही माणसांना पाझर फुटत नाही
माणसांनी जाळलेल्या झाडाने
परवा कमालच केली
फिनिक्सवर मात करीत
जळालेल्या खोडातून
नवी फांदी उगवली
माणसं अजून लेकी सुना
आणि झाडंही जाळतात,
जळणारी झाडे, लेकी सुना
त्यांच्या व्यथांची फुले सजतात
गंधाळून उमलतात तरीही
माणसं माणसंच आहेत
झाडं झाडांप्रमाणे वाढताहेत
भुई मात्र दोन्ही पुत्रांकडे
तितक्याच वात्सल्याने पाहते
तेव्हा झाडं शहारतात
आणि माणसं निर्ढावतात

२.

## झाडे झाली तनामनाची

हिरवळ दाटे घनवर्षावी
झाडे झाली तनामनाची
दर्याल्हारा* किनाऱ्याला
वाळू भिजली आनंदाची

दवबिंदूतून सूर्यकणांचे
नहाण आगळे चालले
तृणपाती शहारली
फूल फुलता कोवळे

पक्षी वयामध्ये येता
नदीसंगमी प्रीत रंगली
झाडांमधुनि शीळ
कोकिळेने कशी घातली

ल्हारा = लाटा

३.

## सत्याचंच स्वप्न होणारंय

धूळ माखलेली झाडं
उन्हात हसू लागली
की समजावं
वादळ येऊ घातलंय
डोंगर कपारींतून
उसळणारे झरे
आटून फुरंगटले
की समजावं
झाडांचा विलय होणारंय
तिठ्यावरचे झाडावरचे
अन् मनातलेही
कावळे कलकलू लागले
की समजावं
सत्यच कालवा करतंय
असत्याच्या दावणीला
सत्य बांधून त्याला
लोक नाचवू लागले
की समजावं
सत्याचंच स्वप्न होणारंय

४.

## झाडावर बलात्कार केला

सैतान शिरला अंगात  अन्
मी झाडावर बलात्कार केला
संवेदना सारी आता हरवली
अन् सारी पाने मी ओरबाडली
जून पाने अन् काही कोवळी
पाहिले नाहीच काही इतरत्र
झुडपांचे मग थरथरले गात्र
आधीच पावसाचा मारा होता झाला
त्यातही अचानक माझा पडला घाला
बाजूचे गवत कण्हले पाहून माझा अवतार
आलो भानावर तेव्हा
कळले,किती झाला अत्याचार
मग किनारा उगाच हसला
खेदाचा लवलेशही त्यात नव्हता
अखेर तोही आता
माझ्याच बाजूने झाला होता

५.

## एक वठलेलं झाड

एक वठलेलं झाड
माझ्या देहात शिरलं
अन् अचानक माझं
मनही किती थिजलं

किती चिवटचि खोड
होतं जरी वाळलेलं
अचानक कुठूनशी
फुटलेली कोंब सल

तसं थरारलं मन
माझही तेव्हा उगीच
माझ्या वाळलेल्या मनी
स्वप्न फुटलं आशेचं

झाड आलं कायेतून
मगं रुजल भुईत
मन तेव्हाच उडाल
ध्येय उंच आकाशात

माझ्या मनाचंच तेव्हा
एक झाड तरारलं
अन् भोवतीचं वारं
किती मधाळ हसलं

६.

## झाडांच्या मुळांवर
## उठलेली माणसं

झाडांच्या मुळावर
उठलेली माणसे
भलते सलते बोलत
झाडांवर आरोप करीत
पुन्हा पुन्हा नादान बनत

झाडांचे ऋण विसरून
माणसे बेताल झालीत
अजाण उनाड बनलेली
बघ अद्वातद्वा  बोलीत

मायला माय न म्हणणारी
माणसे कृतज्ञ असतील?
तर ती माणसे कशी उरतील?

झाडांचे असे आभाळ
खुज्या माणसांच्या कवेत
मुळीच नाही मावत

७.

## क्रौर्याला हुंदके कुठे कळतात?

झाडं अन् वेली
वयात आल्यावर
वाईट पडते नजर
कुणाचीही त्यांच्यावर

वखवखलेली माणसे
बलात्कार करतात
अन् उपभोगानंतर
मानाही मुरगाळतात

मूकपणे सोसतात
वेली अन् झाडं हे सारं
त्यांना कधी साथ देत नाही
हे बेभानलेलं वारं

बेमुर्वतांनी त्यांना ठार केलं नाही
तर आत्महत्येचे काढतात
वेली अन्झाडं हत्यार
शिवाशापही मौनानंच देतात

सोसणेही त्यांचे मुकाटपणे सतत सुरूच
संवेदनशीलपणे जगणे?
नराधमांना कुठे असते

वेली अन् झाडे बेगुमान मरतात
त्यांचे आक्रोशही जळतात
उभा जन्म दुसऱ्यांसाठी
ते उन्हात तळतात

उन्हेही तशीच बेमुर्वत
त्याना पर्वा नसते झाडांची
वेली, झाडे मात्र दिसतात
त्यांचेच दुःख उगाळत उमाळताना
भुईला भार होणारी माणसं
भुई तोलणारी झाडं तोडतात
अन् कळत नकळत
आपलेच आयुष्य खुडतात

वेली अन् झाडांचे हुंदके
गिळताना भुई तळमळते
तोडणाऱ्यांच्या मनातील
क्रौर्याला ते कुठे कळते?

८.

## नवे नवे यमदूत

विषारी बनणार आहेत
सगळी हिरवीगार झाडं
 झाडपण विसरून आता
ऑक्टोपस बनतील खोडं

स्वार्थासाठी कत्तल करणाऱ्या
माणसांना आता गिळतील
आणि कदाचित त्यांच्या मागे
जोरजोरात धावतील

आता कुऱ्हाडीचे दांडे
गोतास काळ होणार नाहीत
होतीलही तसे पण
बनविणाऱ्यांचे नवे नवे यमदूत

९.

## कोलाहल

किती सहन करावा
कावळ्यांचा कोलाहल
खेकड्यांच्या चालीनेही
पडे किनाऱ्यास पीळ

त्याने हेरून ठेवले
बीळ किनार काठाला
पदरव माणसांचा
घात करतो जिवाला

१०.

## जगतात झाडे
## माणसांच्या साठी

वाळल्या खोडाला
पालवी फुटली
तरीही खुडली
माणसाने
अशी जरी झाली
किती आगळीक
झाडे देती सुख
माणसांना
काटाच काढला
जरी माणसाने
झाडे गाती गाणे
सुखाचेच
जगतात झाडे
माणसांच्या साठी
मरणाच्या गाठी

घेऊनच
उन्हाळ्याला देती
सावलीचे सुख
उन्हाचेही दुःख
समजून
फकिरी बाण्याचे
झाडाचे वागणे
निसर्गाचे लेणे
त्यांच्या अंगी
मुळांचे जीवन
शोधण्यास जळ
जरी नाही बळ
खोडामध्ये

११.

## आले जांभळाचे दिस

आले जांभळाचे दिस
भुई सारी जांभुळली
कोणा वात्रट पोराने
शाई उधळून दिली?

भुईवर पडलेली
जांभळे सुकून गेली
जणु फुलपाखरांची
काया अशी कोमेजली

जांभळाच्या पावलांनी
पोरे घरामध्ये येता
मातीलाही गंध किती
जांभळून गेला होता

दुःख चिरडले गेले
ठायी ठायी जांभळाचे
परी म्हणती, यातून
झाड फुटेल उद्याचे

झाड फुलते जांभळे
जरी दुःखातून आता
जांभळाच्या मनी त्याची
सदा फुलतसे व्यथा

भुईच्या सुवासातचि
जांभळाचे मन गुंते
पावसाचे थेंब येता
लुप्त पाखरांचे जथे

१२.

## पारावरचा लिंब

पारावरचा लिंब तुटला तेव्हा
कोणी केल नाही दुःख
असताना मात्र सगळे
घेत खुशीत सावलीच सुख
बाळगोपाळ खेळत खुश्शाल
अन् म्हातारेकोतारे घेत विश्रांती
रिकामटेकड्यांचा चाले मग
पत्त्यांचा जुगार, अन् पानपट्टी
कित्येकांची घरे बांधणारा
क्वचितकाळी मोडणारा हा लिंब
सगळंच पाहतो आता
किती अगतिकतेने हा लिंब
कोणीच नाही फटकारलं
अन् गोंजारलं कधी प्रेमाने
आता झाला पारही उजाड
सगळंच पाहतो स्थितप्रज्ञतेने

आता पारावरच्या लिंबाजागी
कोणीतरी नवीन रोपटं लावलं
पण लिंबासारख नाही तगल
आता केवळ उत्सवापुरतं उरलं
लिंबाचा वारसदार म्हणून
एक कसलंसच झाड वाढलंय
सोबतीला त्याच्या कचरा कुंड
अन् मनात लिंबही कुढतोय
सर्वत्र गटाराची दुर्गंधी नि
पारही थकला वेदना गाळून
म्युन्सिपालटीची माणसं
विसावतात दमून भागून

१३.

## पार मूक

म्हसोबाच्या पारापुढे सोनाराची ठकठक
आणि घड्याळाची टिकटिक
मी ऐकत असते दशके कित्येक
तेथे थबकतात थोडे कधी
रस्त्यावरून येणारे जाणारे
देवाला साकडे घालणारे
आता सोनारही नाही
टिकटिकही थांबलेली
घड्याळही आता रुकली
काही दिवस होती टिकटिक
तेथे एका घड्याळजीची
आता फक्त काळजीची
पारावरचा लिंब तुटला
अन् पाखरेही उडाली
अन् काळाची पावले चालली
नव्या पिढीची आता चाले
पाराभोवती टिकटिक
पण लिबंही सुकला अन् पार मूक

१४.

## कळ्यांचे श्वास नि:श्वास

कळ्यांचे श्वास निःश्वास
जन्म गंधास देतात
पण त्यांचे कढ तुझ्या
डोळ्यांत कसे येतात?

पर्णरंध्रांचे रंग कुठे
फुलांच्या मनी येतात
वाऱ्याचे संगीत मात्र
तेवढेच ध्यानी घेतात

ती मुळांची तीव्र आस
गर्भ वेणांत रुजते
कविता जन्मताना ती
शब्दांतून पाझरते

ती ओढ्याची ओढ वेडी
घेती किती आढेवेढे
काठावर ओथंबती
कशी झुकतात झाडे

किती वर्षांनी ओढ्याला
मिळे नवे नवे पाणी
आनंदाने पाखरांच्या
ओठी येती धुंद गाणी

१५.

## हाक चातकाची

असा पिसाटला वारा
झाडे थरारून गेली
पिल्ले घेऊन पोटाशी
पाखरेही चूप झाली
किती पागोळ्या झरती
कौल फुटुनिया गेले
घरामध्ये आता तिच्या
मोठे जलाशय झाले
हात उंचावून झाडे
नभा घालतात साद
काळ्या ढगांना पाहून
झाला तृणाला आनंद
मनमुराद मोकळा
मृग बरसतो आता
भुई भळीतून तेव्हा
गाते तुकयाची गाथा
फुटो नभाला पाझर
हाक चातक मारतो
उघडल्या चोचीतून
थेंब मनात भरतो
नीरफणसाची पाने
द्रोण पसरून हाती
मुळा लागता तहान
थेंब थेंब त्यांना देती

१६.

## वेदना फुलांच्या

झाडांच्या पानांची भाषा
फक्त वाऱ्यालाच कळते
झाडांचे सुख दुःखही
फक्त त्यालाच वळते

फुलांच्या वेदना तेव्हा
सुगंधातून वाहतात
कोवळ्या कळ्याही मग
लाजूनच फुगतात

त्यांचे सर्द दर्द मौन
दंवातून पाझरतं
तेव्हा नकळत झाड
गद्‌गदून उठते

१७.

## पुन्हा एकदा

निष्पर्ण झाडांचं
गोठलेलं रक्त
आता वाहणार आहे
त्याला लपेटलेल्या
बांडगुळाच्या वेलीतून
पुन्हा एकदा

१८.

## भुईस घोर

असा अवेळी येता पाऊस
भुईस लागे कसला घोर
ऋतू बदलाचे असे सोहळे
वेध तयांचा किती अघोर
ऋतुगंधाने न्हाली धरणी
तसे खळाळ हे झाले झुरणी
डोहतरंगी डुबे पक्षी
आभाळच मग होते साक्षी

१९.

## तक्रार

आता माझ्या अस्तित्वाची नोंद
होत नाही सात-बाऱ्यावर
भुईनं केली तक्रार
गाव सोडलं पोटासाठी
तेव्हापासून तिथली
नाळ त्याची तुटली
पाचटंही आता वाळलं
उसाची किती कुरकूर
पाण्याविना कोरडं वावर
रेशनकार्डावरचं नाव
भावान काढलं
घराशी नातं तुटलं
पिकपाणी नोंद करून
पडीक जमीनही पिकते
शेतकऱ्यांना कुठे कळते?
बोरी गेल्या बाभळी गेल्या
बांधावरचे वाद मात्र तसेच
शेताला होते कसेकसेच!

२०.
## सोस

झाडांची सुकली पाने
अन् सुकणारे तळे
रस्त्यावर पाचोळ्याचे
अधिराज्य पसरले

नाचवती जग सारे
जेव्हा वाऱ्याचे आवर्त
रस्त्यातून उमटते
खोल कितीतरी आर्त

बेबंद जिणे हे त्याचे
धरबंद त्याचा सर्वां
बेताल वादळ वाऱ्या
कोणाची असते पर्वा?

आटले तळ्याचे पाणी
रानांचा वाढला शोष
मुळांचाही वाढे तेव्हा
जगण्याचा सारा कोष

२१.
## चांदण्यांची कुणकुण

ओढ्यांचे नाले झाले
गंगेत वाहते मळी
डोंगर उतारा जीवन
घेते कुठे उसळी?

तोडून फळती झाडे
खुरट्यांवरती प्रीती
धरणी आभाळाचे
अंतर वाढते किती?

ऐन रामाच्या प्रहरी
भलते तापते उन्हं
टळटळते दुपारी
चांदण्यांची कुणकुण!

२२.

## पावसाला म्हटलं ये

पावसाला म्हटलं ये
मनातलं काही सांगायंच
तो म्हणाला थांब जरा
अजूनही मी त्याची
वाट पाहत थांबलोय
पंढरीच्या विठोबासारखी
माझ्या माळावरंच झाड
माझ्यासारखंच शिणलंय
त्याची वाट पाहूनच
सुकलेली त्याची मुळं
मातीशी एकरूप झालीत
मातीनही मग उरातलं
थेंब-थेंब पाणी पाजवून
आजवर त्याला जगवलं
तेच झाड आज आता
माझ्यात शिरलंय न्
घुमू लागलंय ... आणि
मी पावसाला म्हटलं ये !

२३.

## श्वास वाऱ्याचे कोंडले

झाडे तोडली तेव्हाच
श्वास वाऱ्याचे कोंडले
किती प्रयत्न करून
नाही मोकळे ते झाले

रुद्रवीणा वाऱ्याची ती
तेव्हा थंडावली होती
समुद्रात लाटांनीही
मान टाकलेली होती

कूस उजव गे तुझी
वारा विनवी भुईला
वारा वाहू दे जोमाने
श्वास होऊ दे मोकळा

२४.

## कूस

आले कॅनॉलचे पाणी
रानी पिकला हा ऊस
परी धरणी उदास
कशी मायेवीण कूस

कूस पाचटांचे टोचे
जरासुद्धा माया नाही
शेतकरी पैसेवाला
धरणीची वज* नाही

---

वज = किंमत/पर्वा

२५.


## माणसांची खैर नाही

झाडं व मुली वयात आल्या की
माणसांच्या नजरा वखवखू लागतात.
त्या नजरांनीच ती लागतात सुकू

वेदनांनी त्यांचे डोळेही सुजतात
त्यांच्यावर बलात्कार करून त्या नजरा
हातही टाकतात, अन्
कलम करतात देह व मन
ही अश्राप झाडे व मुली फुत्कारून

त्यांच्या नजरा बाद करतील
तो दिवस दूर नाही,
मित्र असलेला माणूस वैरी झाला
आता त्यांची खैर नाही...

# गेय कविता



२६.

## मी टाळतो

मी टाळतो धुक्यात जाणे
मला बाधते दंवात न्हाणे

दंवात न्हाते सारी सृष्टी
गवतालाही फुटते दृष्टी

पहाट वेळी झाडे फुलती
कुंद कळ्यांनी गंधून जाती

बहरे मग अधरी गाणे
प्राजक्ताचे हसते गाणे

२७.

## पक्ष्यांचे विसरे गाणे

गंधात कळीच्या त्या
भुंगा हरवून जातो
पाहून गुंजन तयांचे
पक्ष्यांचे विसरे गाणे

आलाप नभाचा आर्त
वेलींना घालतो साद
ऐकता तयांची वाणी
पक्ष्यांचे विसरे गाणे

आकाश पाऊस झेला
देतो धरणी प्रियेला
देखता प्रेम तयांचे
पक्ष्यांचे विसरे गाणे

चाहूल दुःखाची लागे
दचकून मन जागे
भीतीने काळजीच्या
पक्ष्यांचे विसरे गाणे

झाडांस घाव देती
बोन्यास वाढतो दारी
वाढत्या प्रदूषणात
पक्ष्यांचे विसरे गाणे

२८.

## छळतात ही माणसे?

का इथल्या कळ्यांना
छळतात ही माणसे?

का उघड्या जखमांवरती
चोळती मीठ ही माणसे?

गातो चोरून कोणी
गाणी वेदनांची?

का हसतात त्याला
उगाचच ही माणसे?

जातात एकटे रस्ते तेव्हा
का गर्दी करतात ही माणसे?

का लढतात भावनांशी
तापून ही माणसे?

का चाळविती आस मनीची
साळसूद ही माणसे?

वेळूच्या बनात नाचे कोणी
का चोरून पाहतात ही माणसे?

बोलावतो संगतीला कोणी
का सोडतात त्याला ही माणसे?

२९.

## भीतीचा पहारा

देऊ नको आता । आसवांना थारा ।।
पाहे नभातून । डोकावून तारा ।।
मायेची चांदणी । फुलांत हसली ।।
डोलतो कसा हा। अचानक वारा।।
काडीमोड झाली। गंध सुमनांची।।
बागेत सुकला । फुलांचा पसारा ।।
जीव तळमळे । दर्यात माशांचा ।।
सारा खेळ खारा। वाटला लाटांचा।।
तिन्ही सांज होता। वाजते पाऊल ।।
मनात चालला । भीतीचा पहारा ।।

३०.

## नदीकिनारी

वेचून घेतो । काळोख थोडा ।।
सांजवेळी मी । नदीकिनारी ।।
गूढ बोलणे । झाडांवरती ।।
अस्वस्थ होतो।। नदीकिनारी ।।
माझे हे गूज । राहते मनी।।
बोलतो मना । नदीकिनारी।।
तुझ्या डोळ्यांत । दाटते भय ।।
सांगति लाटा । नदीकिनारी ।।
माझ्या मनीचे । मला कळते ।।
जाणून घेते । नदीकिनारी ।।

३१.

## श्रावण आला

अंबरातले निळे झरे
उतरुनी भूमिवरी आले
रम्य मनोहर सजलेले
डोंगरातले नदी – नाले
काठवरच्या तरू लतांना
छेडित कशा या जलधारा
आला श्रावण श्रावण आला
संगे घेऊन सणांची माला

३२.

## हा किनारा

हा किनारा
सांजवेळी ओलावतो
अन् नदीला
पार नेण्या बोलावतो
चोरून चंद्र
नभातून डोकावतो
पाहुनिया प्रेमिकांना
लाजून ओशाळतो

३३.

## सुखाची मुजोरी

सुखाची कशाला
जपावी मुजोरी
उरी दुःख घेते
नव्याने उभारी

उगी ढाळती हे
नयन का अश्रू
उभा दारी ठाके
नवा रोज शत्रू

सुखाला जराशी
फुलांची उधारी
सुगंधात न्हाते
भुई का दुपारी

भुई पावसाची
सदा वाट पाही
कुपाच्या जलाला
कुणी हाक देई

३४.

## जपायला हवे

कळीला फुलाने जपायला हवे
सांगून आकाशी उडतात थवे

पाखरे अनभिज्ञ तरी ज्ञात होती
सावलीस शोधे कुणी वाळवंटी

मृगजळही काही जपायला हवे
पंखांनी अपुल्या हलायला हवे

दिवे लावे कुणी झाडांच्या खालती
प्रकाशाला थोडे जपायला हवे

किनाऱ्यास लाटा वाळू लोटतात
तरीही फेसास जपायला हवे

भवताली धुके काकडते तेव्हा
शालीत कुणाला जपायला हवे

३५.

## नका

या फुलांना समजावतो मी ।
दुःख हे दावू नका ।।धृ. ।।

काटे जरी सोबतीला।
गंध गुपित ठेवू नका ।।

या कळ्यांना समजावतो मी ।
कळा या लपवू नका ।

वेदनांत लपलेला ।
हर्षही दडवू नका।।

या पर्णांना समजावतो मी ।
रंग हा हरवू नका

हरित मनही नित्य माझे
उगाच असे फसवू नका

या फळांना समजावतो मी
सत्त्व हरले, बीज ही हरवू नका

३६.

## मायेचा नाही फिरला

मायेचा नाही फिरला हात ।
कशी गं सुकली तुझी ही कातं? ।धृ.।।

डोळ्यांतील तुझ्या गं पाणी ।
गेलं का गगनाच्या संगतीनी ।
खळी रुसली का तुझी गालात? ।१।

ओठात भीतीचं ,दाटलं गाणं।
सरलं नाहीच, रडणं रुसणं।।
तरीही फुलंत कसं हसू मनात? ।।२। धृ.।।

थेंबात दवांच्या जडले हे मन
तसेच वाटे तुझे हे रुदन
काजळ भीतीच ल्याली ही रात? ।।३।।

३७.

## कसा

कसा शांतवू मी
कळीच्या कळांना
तिचे दुःख गंधातूनी
असे दाटले हे
अशा मंद रात्री
नभाचा पहारा
किती चांदण्यांनी
जागवीत जाणे
तिचे दुःख गोठे
फुलांच्या परागी

३८.

## येतो वर्षत गर्जत

येतो वर्षत गर्जत
माझ्या मनाचा आषाढ
घन तिमिर दाटती
त्यांचे उकलेना गूढ

जवळचि असे सखी
पण मनात दुरावा
मनाच्या आषाढ घना
प्रेमबाग फुलवावा

प्रीत रीत  जुनी झाली
किती आषाढ सरले
मन ओढाळ आषाढ
रोज तरी बहकले

साथ आषाढ घनाची
गीष्म तणाव सारतो
मीच तेव्हा वर्षावात
तुझ्या प्रेमाच्या नाहतो

अशा आषाढाच्या सरी
किती मनी कोसळती
पहिल्या आषाढप्रेमाची
याद जागतसे चित्ती

३९.

## आषाढ गाणी

आषाढ आला घन दुरून आले
तव आठवाने मन भरून आले ।। धृ.।।

आषाढ पहिला छळतो असा हा
नयन हे माझे विरहात ओले
साजन कसा तो ठावूक नाही
रूप तयाचे गात्रांत भरले ।१। ।। धृ.।।

स्पर्श तयाचा उल्हास भरतो
सौभाग्य लेणे हर्षात न्हाले
आषाढ सरींचे बेफाम जगणे
नव उन्मेष ऐसे कोंबात हसले ।२।।। धृ.।।

आषाढ येतो सजतो, रमतो
संगीत सजते, धरणी डोले
आता कुठे ती आषाढ गाणी
छंद उरीचे उरात उरले ।३।।। धृ.।।

४०.

## इशारे आसवांचे

इशारे आसवांचे सारे कळून आले
नजरेच्या खुणांचे ते अर्थ जुळून आले

भरतीस किनाऱ्याची घालमेल जाहली
आवेग सागराचे वाऱ्यात भरून आले

ही 'वेळ'* सागराची  चंद्रास कळली तेव्हा
किरणांचे स्नेहधागे ते ओघळून आले

पाहून खेळ न्यारा दर्यात चंद्रतारा
उधळीत मोती सारे ते लाटातून आले

तुडवीत सर्व जाती वाळूत भावनांना
वेदनांच्या फुलांचे ते सर्द रूदन आले

वेळ = किनारा, वेळ = टाईम

४१.

## ते थेंब नभीचे

ते थेंब नभीचे गंधित झाले
ते शोषले कुणी?
झाडांनी, कळ्यांनी...? नाही
वाऱ्याने? नाही.. फक्त माणसांनी
ढग गर्जत आले, बर्सत गेले
आता रोखले कुणी?
ताऱ्यांनी, पुष्पांनी? नाही
जंगलाने? नाही.. फक्त माणसांनी
ती धार पावसाची मस्तीत न्हाली
आटवली कोणी?
झऱ्यांनी, नद्यांनी ? नाही
धरणांनीही नाही .. फक्त माणसांनी
सारे करून सवरून
नभास रोखले कोणी ?
चंद्राने, सूर्याने ? नाही
ऋतू बहराने? नाही.. फक्त माणसांनी
ते रुदन पावसाचे, कुणी ओळखले
माणसांनी, पाखरांनी, कळ्यांनी
नाही ...
फक्त त्या गंधित थेंबांनी...

४२.

## गेले कुठे ?

गेले कुठे, गेले कुठे, गेले कुठे?
गेले कुठे, गेले कुठे, गेले कुठे?

लाटांचे नर्तन । फेसांचे सर्जन
सागर गर्जन । गेले कुठे?

पर्जन्य गुंजन । पवन चंदन।।
सुगंध मोहन । गेले कुठे? ।।

भ्रमर गायन । पुष्पाचं हुंगण ।
पराग सिंचन । गेले कुठे?।।

शेणाचं शिंपण । रांगोळी सजण
घराचं अंगण । गेले कुठे?।।

वादळ वर्तन । ढगांचे मर्दन ।।
विजेचे लख्खन। गेले कुठे?।।

वाऱ्याचे कर्षण। गारांचे पतन ।।
पाऊस सृजन। गेले कुठे? ।।

४३.

## गीत वेदनांचे

असे येतात कोठून
मळभ दुःखाचे
कळेना मनाला कसे
पिसे चांदण्यांचे

गंध शीतल चंदन
बाधतो कशाला?
शब्दांत रुतले अर्थ
भाव वेदनांचे

जातो शिंपित पाऊस
नभीचा आनंद
भुईच्या मनात वाढे
बळ रुजण्याचे

घेतो अंकुर रुपडे
डोंगर कुशीत
मनात जपतो कोणी
गीत वेदनांचे

४४.

## होता

तुझ्यावर मी
जीव लावला होता
परी तू माझा
कचरा केला होता ।।१।।

जरा मी बोललो
तुझ्याशी प्रेमाने
परी तू त्याचा अर्थ
वेगळा लावला होता ।।२।।

कितीदा नजरभेट
उलगडून गूढ गेली
परी त्यातही काही
अर्थ लोपला होता ।।३।।

नसे स्वार्थ काही
माझ्या बोलण्यात
तरी त्याचा सर्वांनी
गवगवा केला होता ।।४।।

जरी मौनात गेलो
समजून  सर्व काही
रुसवा माझा कोणीच
नव्हता काढला होता ।।५।।

असे सागरात जाळे
पकडण्या कुणासाठी
तरी त्यात माझाच
पाय, अडकला होता ।।६।।

४५.

## नववर्ष

तव स्नेहाची ज्योत तेवते नित्य अंतरात
सरे वर्ष परी ममता हृदयात
ध्रुवापरी दूर जरी, मने एकरूप
पत्रभेट ही घेतो वर्षारंभात
गतवर्षामध्ये मने जुळली
तसेच प्रेम राहो सदैव
नववर्ष हे सुखमय जावो
करू स्नेहाची देवघेव
सरत्या वर्षासंगे जातो
किल्मिषांचा दुःसंग
नवे वर्षे येईल घेऊन
आनंद सुख अभंग

४६.

## सवाल मुलाचा !

कधी नव्हे ते परवा ओढ्याला पाणी आलं
बघितलं! पावसाच नव्हतं, गटारातून वाढलं
आजुबाजूची झाडं तेव्हा कुजबुजली
त्यांची वाढही तेव्हापासूनच खुंटली
झाड म्हणजे काय असतं
कॉन्व्हेंटमधल्या मुलाचा सवाल!
आईबापाच्या जिवाला कहार

४७.

## इतके सारे घाईत

ठेच कुणास लागते
अथवा रक्तबंबाळ
आपणास किती काम
इतके सारे घाईत

माझेच म्हणणे ऐका
चालतो सदाच ठेका
ऐकू कुणाचे कशाला?
इतके सारे घाईत

रुदन हे चाललेले
कानावर पडतेही
कानाआड करतो का
इतके सारे घाईत

४८.

## जिंदगी

अष्टौप्रहर तुझ्यासवे
चालते ही जिंदगी
जाता जिवलग कोणी
दुखवते ही जिंदगी

गर्दीत भोवतीच्या
हरवते ही जिंदगी
दुःखभार कितीक हा
पेलते ही जिंदगी
प्रीतगीते वाऱ्यासवे
गुंजवते ही जिंदगी

४९.

## काळोखाचे दीप

काळोखाचे दीप आता
सर्वत्र लावतो आहे
रोखला प्रकाश आहे

जेव्हा जगतात येथे
कोणी आकाश खेचतो
कुणी खुडला प्रकाश

झाली दावण रिकामी
बैल सुटले मोकाट
अन् वाराही सुसाट

५०.

## चोचीतून किती कळ

उन्हाला लागता झळा
पक्षी टिपतात तेव्हा
चोचीतून किती कळ

५१.


## मन

निळे कोरडे आकाश
मायेचा ओलावा नाही
कोंबांचा तहानटाहो
मातीत जिरून राही

गेले करपून कोंभ
नाही काळजी नभाला
झाडांची सुकली काया
खंत सांगावी कोणाला?

पाचूंचे ऋतू सोहळे
खग थव्यात गुंजते
थकलेले मन तेव्हा
तरुतळी विसावते

# मुक्तछंद आणि मी विषयक
# काही कविता



५२.

## नक्षत्रांची गाणी

चांदण्या चित्त वेधून घेतात
माणसे श्वास रोखून धरतात
नदीच्या पात्रातली खळखळ
माशांचे जीव हरण करतात

कुठे वादळाचे तांडव चाले
काठावरचे थरथरणारे झाड
बेताल होते, आसक्त होत जाते
आणि पक्षी धुंद गाणे रेकतात

डोंगरातील खडकांच्या
प्रतिमाही मन घाबरवतात
तेव्हा आकाशात कधीतरी
नक्षत्रांची गाणी पाझरतात

फुकटचे सल्ले देणं
आणि विकतंचे घेणं
हल्ली मी बंद केलंय
तरीही

झाडं सावली देऊ का?
पक्षी थोडं विसावू का?
असं सारखं का विचारताहेत?

पानगळ होताना थबकू का,
असं विचारतो वारा
अन् अवकाळी पावसात
पडू का? विचारतात गारा

५३.

## अस्तित्व

हे आख्ख शहर आता
डस्टबीन बनण्याच्या
मार्गावर निघालंय
प्रदूषित चेहऱ्याची अन्
मनाची ही माणसे,
घालतात आताशा
धूर अन् धुळीचेच मास्क

त्यांच्या स्पर्शाने होताहेत
ही झाडे झुडपे बाधीत
अनिष्ट वायूंचे सेवन करीत
कशी बशी तग धरतात

त्यांच्या निःश्वासातून
उत्सर्जित होणारे धुलीकण
डस्टबीन झालेल्या शहरात
आता आपले नातेबंध शोधताना
हरवतात आपले अस्तित्व

५४.

## डस्टबीन

डस्टबीन बनलेलं हे शहर
अस्ताव्यस्त पसरलेली माणसे
अन् कचऱ्यावत बनलेली त्यांची मने
उचलायला नसतो कोणी स्वीपर

या उद्‌ध्वस्त शहरात
वैभवाच्या खुणांचे ओझे वेशीवर
आणि मनात इतिहासाचा कहर

इथले पिंपळ अन् पारही
उरातले सल न् भावनाही
इथली मुले, प्लॅस्टिकच्या पिशव्या
अन् बायाबापड्यासुद्धा
अगदीच अगतिक बनलेत
त्यांचे अश्रू कोण पुसेल बरं
शहर नसते पण कचरा असतो
वाऱ्यानं कचरा उडतो
इतस्ततः साठतो
आणि उमलते नवे शहर

५५.

## चालायचंच

कळ्या सोसतात, चालायचंच
फुले सुकतात, चालायचंच
वेली झुरतात, चालायचंच
झाडांना घाव माणसाचे
कितीएक शाप घरट्यांचे
निर्ढावले की चालायचंच
ओढे नाले आटतात
काठावरचे ताड झुरतात
भळी* उलगतात, चालयचंच
मने फाटतात, चालायचंच
दुःखावर मीठ, चालायचंच
काठाकाठानं जाणाऱ्यांना
पाण्याचं काय, चालायचंच
चालायचंच म्हणून आता
किती दिवस चालायचं?

---

भळी = जमिनीला पडलेल्या भेगा

५६.

## जमान बदलल्याचं चिन्ह दुसरं काय!

पोरासोरानं ऐकून न ऐकल्यासारखं केलं की
पूर्वी जाणते म्हणायचे
काय? कानात खुट्ट्या कोंबल्या की काय?
आता आईबापंच देतात
मुलाबाळांना, लेकीबाळींना
मोबाईल, इअरफोन, हेडफोन
कोंबतात ते रात्रंदिवस कानात
जमाना बदलल्याचं चिन्ह
दुसर काय!
शेती म्हणजे काळीमाय
गाय म्हणजे प्राणीमाय
भूतदया, भुकेल्यांना अन्न
एकेकाळी होतं भूषण
आता बुफेतही अन्न टाकणं
मानतात प्रतिष्ठेचे लक्षण
जमाना बदलल्याचं लक्षण
दुसरं काय!
दिवे लागणीला देवापुढं
दिवा लावणं, शुभं करोती म्हणणे
अलिखित नियम होता
वृद्धांना नमस्कार करणं
हाही मानच होता एकेकाळी
हाऽय हॅलो, सॉरी म्हणत
म्हाताऱ्यांचा कचरा करणं
नवी नाती, नवा मंत्र
जमाना बदलल्याचं लक्षण

दुसरं काय!
पूर्वी डॉक्टरकडे गेलं की
नाडीपरीक्षेनेच निदानं होई
तिथेच औषधही मिळे
तपासणी लागतच नसे
फीचाही नव्हता बडेजाव
हल्ली डॉक्टर विचारतात
काय झालं? कुठं दुखतं?
चला तपासूया रक्त
हृदयविकार आहे का?
शुगरप्रॉब्लेम वगैरे!
मग कंपन्यांच्या हुकमाने
प्रिस्क्रिप्शन देतात डॉक्टर
जमाना बदलल्याचं लक्षण
दुसरं काय!
तसलेच तुम्ही
म्हणतो माझा पोरगा
किती झालायं कोडगा?
आमची हिंमत नव्हती
आईबाबाची टिगल करण्याची
भीती होती नजरेची
जमाना बदलल्याचं चिन्हं
दुसरं काय!
अंगणात येत पूर्वी
कितीतरी चिमण्या
दाणे थोडे टिपण्या
आता अंगणच गेलं
देणाऱ्याचं मनही जिरलं
ज्याला त्याला कावलं
जमाना बदलल्याचं चिन्ह
दुसरं काय!

५७.

## आपण किती बरे किती खरे?

आपण किती बरे! किती खरे?
आपल्याला तरी कुठे असते माहीत?
आपण हरवून बसलोत
आपलेच निरागसपण
मुक्त हास्य अन् निर्लेपपण
भोवती वावरते कचकड्याची दुनिया
आपली करीत सदा भुलावण
जागतिकीकरणात आपण नुसतेच गिऱ्हाईक
उत्पादनांच्या जाहिरातीचे सावज
आपल्यालाच बनविण्याचा घाट
पारध करतात किती सहज
आवेग ओसरून गेल्यावर
किती बेभानतो आपण
प्रीती, ओढ क्षणात विसरतो
अन् बनतो विलक्षण

५८.

## कबिले

बरोबरचे सर्व कबिले
चार हात दूरच राहतात
परस्परांच्या गळ्यातले हात
मग अवचित अपरिचित होतात
दर्यासारखे निश्चिंत
होता येत नाही आपल्याला
लाटांतून हर्ष पाझरतो
अन् झाडांना आवळतो
झाडे बेगुमान केविलवाणी
निस्तेज होतात फुलांप्रमाणे
श्वास आपलेच अनोळखी
वाढणाऱ्या वेलींप्रमाणे

५९.

## मी एक अस्वस्थामा

मी एक अस्वस्थामा
धकाधकीने थकथकलेला
धावपळीने थकलेला भागलेला
चौबाजूने चिंतेने घेरलेला सदैव मी
वाऱ्याचे श्वासही अस्वस्थ
दर्याच्या लाटाही अस्वस्थ
अन् शांत किनाराही अस्वस्थ
अन् म्हणूनच मी एक अस्वस्थामा
अस्वस्थ विश्व भोवतालचे
काय सांगावे दुजाच्या मनीचे
स्वस्थ दिसणारे, सारे अस्वस्थ

६०.

## आभाळाचे गाणे जगणे

ते तसे सोपे नसते आभाळाचे जगणे
मृगाच्या थेंबात फुलते धरणीचे गाणे
मनात येते तेव्हा मोगरीही झुरते
माझे मन तेव्हा कोमेजून जाते
मुळात तिच्या, मी माती होऊन जातो
पाण्याच्या थेंबासाठी किती आसुसला होतो
मृद्‌गंधांच्या संगे असे तरलते मन
अन् भरते सारे माझ्या फांदीफांदीतून
ते तसे सोपे नसते, फुलांचे उलगडणे
कळ्यांच्या पाकळ्यांतून बाहेर येणे
त्यांच्या भावनांचे गंध तेव्हा कष्टतात
आणि फुलांच्या कोषांतून ढळतात
मीही तेव्हा पराग होऊन न्हातो
अन् गाणे फुलांचे मनातच गातो
अशा मुक्या गाण्याचे काय करावे आता
आयुष्य कळ्यांचे दुःखाचीच गाथा
मी भवताली भ्रमर होऊ पाहतो
पण माझ्याच फुलाला नच तोलतो
गाणे आभाळाचे मग जुळून येते
त्याच्याच तालावर जगणेही होते
आभाळाचे गाणे जगणे मीच शिकलो आता
आभाळगाणे होऊन मीच बरसतो आता
गाणे जगता जगता मीच गीत झालो
उभ्या जिवाचे पुष्पमोगरी बनलो

६१.

## गर्दी भोवतीची

भोवतीच्या गर्दीची सदा भीती वाटते
सुरक्षिततेमुळे नाही, पण एकटे वाटते
गर्दीला मन नसते असतो फक्त वेग
जीवघेणा, धावणारा आणि दमविणारा
गर्दीला नसते भावना, वेळही नसतो
कुणी पडला, झडला तर बघणारा
गर्दीत कुणीच कधीच नसतो
वेदनेवर फुंकर घालणारा
हळवेपणा  हरवतो गर्दीत
तुफान वादळवाऱ्यासारखी
जाते गर्दी बेभानत
नजरा असतात रोखलेल्या
पण त्यांच्यात जान नसते
गर्दी फुलत जात असते
तेव्हा कातावलेले मन
एकटे पडून चरत* जाते
गर्दी असते अप्पलपोटी
स्वतःच्या पायापुरते पाहणारी
काही पायाखाली चिरडलं तरी
निर्विकारपणे पुढे पुढे जाणारी
तिला नसते कसलीच जाणीव
गर्दी रक्ताळलेली असते
बेमुर्वत दंगलीसारखी गर्दीही बेभानत वाहते

---

चरणे = चरत जाते, जखम चरत जाते या अर्थाने

म्हणून हल्ली गर्दीत जायला मन भीतं
एकटेपणाला मात्र त्याचं काहीच नसतं
जोडीदार हरवेल या भीतीनं
कधी हात सुटतील या शंकेनं
गर्दीत शिरलं की तिची नशा चढते
प्रत्येकाच्या अंगाअंगात वारे भरते
गर्दीतला प्रत्येकजण वेगवेगळा
प्रत्येकाचा अलग गोतावळा
जवळ असूनही हाकेइतकं
प्रत्येकजण वागतो परकं
हरेकाचं मन थिजलेलं
म्हणून गर्दीला बरं टाळलेलं
तरीही असते  रोजची गरज
मन सरसावतं होतं निर्लज्ज
भेदरट शरीर मात्र जागीच
खिळून बसतं, आवळत भीती

६२.

## गिनिपिग

आपण असतो गिनिपिग
स्वखुशीने बनणारे
उठल्यापासून झोपेपर्यंत
कितीतरी प्रयोग साहणारे
पहिला चहाचा प्रभाव
आजमावला जातो
चेहऱ्यावर त्याचा भाव
आपसूकच विलसतो
तेव्हा हसते बायको गालात
भाज्यांचे खारटपण,
तिखटाचे प्रमाण
आपणच चवीने
सांगत असतो
निमूटपणे
नव्या नव्या साबणाचे
आणि तेलाचेही परिणाम
त्याचे परिमाण आपणच देतो
हे सगळं कसे लाडिकपणे
अहो बघा ना! कसे झालेय ते
म्हणत, चालते सगळे
आपण सोसतो सोसिकपण
स्वखुशीने गिनिपिग बनून

६३.

## वाऱ्याचे बेताल वागणे

असेच असते सगळीकडे
वाऱ्याचे बेताल वागणे
बेमूर्वतपणे उधळणे
घरादारांची उद्ध्वस्तता
करणाऱ्या माणसांप्रमाणे
हल्ली नसतो धरबंद
कुणालाच,कसलाही
तऱ्हा न्यारीच वाटली तरी
पाहावे लागते निमूटपणे

६४.

## खडकामध्ये न्हात पाखरू

आटून गेल्या साऱ्या विहिरी
जरी जलाचा थेंब न भवती
भुईत रुतल्या खोडावरती
दिसे अचानक नवती
झाडांवरती रात्री
बगळ्यांची फुले फुलतात
निशिगंधाच्या माथी मात्र
काजवेच लुकलुकतात
गवताच्या पात्यांनाही
कधीतरी जाग येते
वाळलेल्या फुलांवर
दंव फुलारून येते

६५.

## गावाकडे गेलो की

गावाकडे गेलो की कळते मित्रांची खबर
कोणी लिहित असतो जीवनाची बखर
गावाकडे गेलो की भेटतात आप्त इष्ट
सांगतात मनातील सगळी गुजगोष्ट
गावाकडे गेलो की भेटतो कोरडा ओढा
जुळवतो आठवणी, त्यांच्या मनी सदा ओढा
गावाकडे गेलो की दिसतो सगळीकडे बदल
झालेली घरांची पडझड अन् होते खळबळ
गावाकडे गेलो की दिसतात नव्या वस्त्या
आठवतं इथुनच काही वाटा जात होत्या
गावाकडे गेलो की कळते सारे भलेबुरे
कोणी स्वर्गी गेलेले, कोणा घरी नवे सोयरे
गावाकडे गेलो की कळतात साऱ्या गोष्टी
आपण साक्षी नसल्याने मन होत असते कष्टी
गावाकडे गेलो की दिसते नवी पहाट
बुजविलेल्या दत्त आडावर जणु चालतो रहाट
गावाकडे गेलो की  दिसतात माणसं जून झालेली
अन् कालची पोरे ज्वानीने मुसमुसलेली

६६.

## माझ्या गावाच्या भूमीत

माझ्या गावाच्या भूमीत
लोकं टोप्या घालतात
झाडे सारी तोडलेली
चालतात ते उन्हात

माझ्या गावाच्या भूमीत
वाहतसे एक ओढा
म्हणे माझ्या सारखेच
तुम्ही माणसांना जोडा

माझ्या गावाच्या भूमीत
आहे बार्शी लाईट रेल
किती मंदगती चाले
जणू पोरांचाच खेळ

माझ्या गावाच्या भूमीत
पाखरांची कलकल
म्हसोबाच्या पारावर
म्हाताऱ्यांचा फतकल

माझ्या गावाच्या भूमीत
सर्जा राजाची ती जोडी
पीकं  पिकली शेतात
कितीतरी खंडी–खंडी

माझ्या गावाच्या भूमीत
आता बदलते जग
गेली शेती, गेली बैलं
करी भुई तगमग

माझ्या गावाच्या भूमीत
नाही माडांचे ते बन
नाही दर्या जरी तिथे
लोकांचे निर्मळ मन

माझ्या गावाच्या भूमीत
आई लावे सांजवात
शुभंकरोति म्हणता
मनी दीप उजळत

माझ्या गावाच्या भूमीत
ज्ञानेश्वरी पारायण
विठू येतो ऐकायला
त्याची पंढरी सोडून

माझ्या गावाचं वैभव
असं होतं एके काळी
आता भावना विहीन
नवी पिढी नाही भोळी!

६७.

## वेदनाहीन

त्यांनी ...
त्यांनी किती सहजपणे
जेजूला खुरसावर चढविले,
अन् ते मोकळे झाले..
त्यांचे ते सहजपण किती वेदनाहीन..
पण जेजू ...
तो शांत निश्चल
आणि त्याचं मंद स्मित
कारुण्यमय, दयेशी नातं सांगणारं!
सनातन आणि अतर्क्यही
तितकचं अनाकलनीय
आजही लोक जेजूसारखेच
कोणालाही सहजच
क्रुसावर चढवून होतात मोकळे
त्याच्यासारखेच शांतपणे
निश्चल होऊन
आम्हीही त्यांच्यासारखेच
होतो आहोत वेदनाहीन...

६८.

## कळत नाही !

कळत नाही
कालपर्यंत सुयोधन भासणारे
कधी दुर्योधन होतात,
कळत नाही!

गळ्यात माळा अन्
कपाळावर टिळे
कधी कापतात गळे
कळत नाही!

मुखदुर्बळ भासणारे
किती वटवट करतात
कळत नाही!

ज्यांचा असतो वट
ते जिंकतात
कळत नाही!

मिळून सगळे
कट रचतात
कळत नाही!

६९.

## कोनवाडा

कोनवाडा की कोंडवाडा
कोनात वाढलेलं ते गाव
कोनवाडा मिरवते नाव
कुंपण नसते गावाला
तरीही असतो तो कोंडवाडा
कोंडवाड्याचेही एक जग असते
माणसांचे अन् जनावरांचे
संसारगाडा ओढणा
देहही एक पाडा

७०.

## वास्तवाचे कटुत्व

आयुष्याच्या विस्कटलेपणावर वैतागलेली ती
घरातील कानाकोपरा आवरावा तशी मनाला आवरते
कोनाड्यात अस्ताव्यस्त कपडे
सगळीकडे मुलांनी पसरलेली पुस्तके
कागदाचे कपटे अन् कपडे
आवरता आवरता नाकी नऊ येतातच, तशीच
ती मनाच्या कानाकोपऱ्यातील कचरा
आवरते पुन्हा पुन्हा आणि वैतागतेही पुन्हापुन्हा
एक कोपरा आवरून झाला की पुन्हा दुसरा
असे सतत सुरूच असते तिचे आवरणे
आणि मुलांचे पुन्हा केर कचरा करणे
तद्वतच मनातील सुप्त आशा इच्छा आकांक्षांचे कोनाडे
ती आवरतेच आहे कित्येक दशके
मुलांचा पसारा, मनाचा आवारा
कोणतीच गोष्ट व्यवस्थित राहत नाही,
तेव्हा ती कातावते पुन्हा पुन्हा
दोष देते स्वतःलाच
आयुष्य म्हणजे तडजोड हे
तिला ठावूक असूनही
तिचे वैतागणे सुरूच
दशकानुदशके, मागे वळून पाहताना
ती दचकते क्षणभर, कुठे आहे?
कुठे आहे, ते स्वप्नांचे आयुष्य?
एकच भोवती सत्य वास्तवाचे कटुत्व!

७१.
**मैना**

चाललो होतो पाटलाच्या मळ्यात
बांधावरती होती ती हलत डुलत
मीही निघालो मागून तिच्या मग
मनात माझ्या होती तगमग
चाहूल तिजला माझी लागे
वाटे म्हणाली  ये ये मागे
रूप सावळे सुंदर पाहून
मोहात पडलो सगळे विसरून
झुलू लागली ती गजगामिनी
तरंग उठले तेव्हा मम मनी
मग अचानक ती बिथरली
माझी काय अशी थरकली
पाहू लागली डोळे रोखून
मीही थांबलो उगा थबकून
डोळ्यात तिच्या काय नकळे
प्रेम होते की अंगार उजळे?

अशी सरसर आली जवळी
माझी मग गाळण उडली
तिचा प्रेमाचा पवित्रा नव्हता
माझ्यावरती रोषच होता
अशी सुंदरी जरी तापली
वाटले पाहिजे ती शांत झाली
म्हणून जरा मी प्रेमाने पाहिले
तिचे डोळेच रागाने बोलले
फुसफुसणाऱ्या नाकामधून
थरथरे क्रोध ओसंडून
मग पाचावर धारण बसली
तेवढ्यात पाटलांची साद आली
'मैने' पावणं हैती चल मागं
मग थोडा तिचा निवळला राग
अशी म्हैस पाटलांची तापट
माझी उडवून गेली त्रेधा तिरपीट
मैना गेली पाटलांच्या मागे
मग मनाला म्हटले बस उगे
अशी फजिती मुळीच नको
ती आस जागते एकच चित्ती

७२.

## मी जपतोच वेदना!

काळजाचा थरकाप उडवणारी
माणसे आणि पशू आता
एकत्र आले आहेत...
उन्हातले चांदणे शीतळ
आजकाल राहिले कुठे?
त्यांचे दाहकपण न सोसण्यापलीकडचे
माझे मीपण कुरवळताना
मलाही आवर्तात टाकणारे
विचारवादळ घोंगावतेय
चक्र वेदनांचे आज पूर्ण झाले
तरीही ते न थांबणारे
हृदयाचे रुदन अरण्यातले
चांदणवेल बहरली अंगणात
तिचे जुई-मोगरे सुगंध
मनाला करतात धुंद
मी तरीही बेबंद होऊन
आवर्तातच अडकतो
चक्रव्यूहापासून काही न शिकताही...
मीच होतो इतिहास सारा
कधी भीष्म, कधी अभिमन्यू
चांदण्यात जळणारी जपत तनू
रानातले वृक्ष लांडग्याहाती
तडफडतात पाण्याविना
मी जपतोच वेदना

७३.

## मी बंद केलंय!

निखळता भेसळीत
मिसळल्यापासून
शुद्धतेचे प्रमाण द्यायचं
मी बंद केलंय!

डोळ्यांतली निरागसता
हरवल्यापासून
मुलांत मिसळणं
मी बंद केलंय!

सांजवात लावायची असते
हे लोक विसरल्यापासून
मी दिवेलागणीचे
परवचे म्हणायंच
मी बंद केलंय!

७४.

## मी असाच आहे

मी असाच आहे, मी तसाच आहे
म्हणतो केव्हा केंव्हा
खरा कसा तो
पण कळतो केव्हा केव्हा
येतो उजळत चहु दिशांनी
अंगावर चंद्र
पण ताऱ्यांचा जीव
व्याकुळ केव्हा केव्हा
नसते माझ्या मनात तेव्हा
खुणगाठ काही
पण ओळखतो मी
मलाच केव्हा केव्हा
अशा सुगंधी उत्तररात्री
शुक्रही जागा होतो
सडा होऊन प्राजक्ताचा
मनी वसतो केव्हा केव्हा
जमून जाते गाणे मग ते
उरात असता दुःख
ओंजळीत घेऊन देतो
थोडे केव्हा केव्हा

७५.

## सुपर स्टोअर

सारं काही वन स्टॉप
मिळत या शहरात
सुपर स्टोअर वाढताहेत
गावाच गावपण हरवतय
येणारच ना ते संकट
चहुबाजूंनी वेढत
कधी अस्मानी, तर कधी सुल्तानी
कधी मुखवटे चढवत
या इथल्या स्टोअरमध्ये
निर्ढावलेपणाचा लिलाव,
घसरत चाललाय
भावूकपणाचाही भाव
प्रत्येक नजर इथली
आता स्पॉन्सरच्या ताब्यात
हळूहळू आमच जीवनही
बहुराष्ट्रीयच्या ताब्यात

७६.

## प्रत्येक वेळी मीच

प्रत्येकवेळी मीच
का नमते घ्यावे
आयुष्य बनेल झाल्यावर
कुणाला सांगावे?
नसतात इथे कुणी
कुणाचेच बांधील
दिवसाही घेऊन फिरतो
आता दुःखाचे तेच कंदील
'नम्र झाला भुता
त्याने कोंडिले अनंता'
ऐसे सांगून गेला तुका
पण तुकोबा तुम्ही तर
सुखी झालात का हो
नमते घेऊन दरवेळी?
कधी धाकटे म्हणून
नमते घ्यावे लागते
कधी मोठेपणासाठी
सदा वाकावे लागते

७७.

## आणि मी दचकतो...

आणि मी दचकतो...
तिन्हीसांजेला आपल्याच सावल्या
सर्रकन जातात अंगावरून
आणि मी दचकतो
पांढरी पाल अंगावर पडावी
तशी विदेशी बाई
सरकते पुढ्यातून, आणि मी दचकतो

मावळतीच्या उन्हाची किरणे
दर्यात रेंगाळतात, लाटांत न्हातात
आणि मी दचकतो

७८.

## आपण अनभिज्ञ

किती अनभिज्ञ असतो आपण
अगदी स्वतःविषयीसुद्धा
भोवती काळजीचे ढीग असूनही
कसे 'सुशेगाद' आहोत असे म्हणतो...
किती अनभिज्ञ असतो आपण
भोवतालच्या जगाविषयी
सगळेच आपले म्हणत
खुशाल बिनधास्त राहतो...
कचऱ्यातले बाँब फुटतात,
पाठीत सुरे खुपसतात,
मित्र! – मित्र राहतात कुठे?
दिवसाही रात्र होते..
तरीही आपण दिवा स्वप्नच पाहतो..
दूरवर कुठेतरी
सूर्य कुजबुजतो क्षितिजावर
तेव्हा मन, किरण होऊन
स्वार होते त्याच्यावर
आपण तसेच पहाट होतो...

७९.

## उलटे

आयुष्याला उलट्या होतात आता
कधी कधी सुखाच्या
आणि फासेही उलटेच पडतात नशिबाचे
मनात चिंतन सुरू
त्याचवेळी घडते मात्र विपरीत सारे
आयुष्य टांगणीला लागते
माणसे भेटतात तेव्हा
आणि ...
एखाद्याची वाट पाहूनही
उरात सलते वेदना तरीही
आयुष्य हसायलाच लावते
हीही उलटीच खुण
हसणाऱ्या चेहऱ्याची माणसे
मनात असतात कष्टी
पण झऱ्याप्रमाणे वाहतात
खळखळ करणारी माणसे
आत शांत किती
शांतपणे जगणाऱ्यांच्या
हृदयाचे ठोके मात्र
धडधडत एखाद्या मोनोरेलप्रमाणे

८०.

## प्रत्येक जण असतो इथे विश्वामित्र

प्रत्येकजण असतो इथे विश्वामित्र
प्रतिसृष्टी निर्माण करणारा
किती काळ टिकेल मैत्री
हे ठाव नसते कुणाला
तरीही इथे कशी
आपसूक जुळत जाता नाती
क्षणाक्षणाला बदलत जाणारी
जो तो दंग आपण निर्माण केलेल्या जगात

८१.

## सगळे तत्त्वज्ञान कळल्यासारखी

सगळे तत्त्वज्ञान कळल्यासारखी
माणसे सदैवच वावरतात
बुद्ध, सिद्ध असल्यासारखी
दुसऱ्यालाच डोस पाजतात
वेळी आली की स्वतः मात्र
कमळाप्रमाणं राहतात
अगदी निर्लेप, निर्विकार
मनाचे व शेताचे बांध
फुटले की सर्वत्र पसरतात
आपल्यातच राहणे
तेव्हा मात्र विसरतात

८२.

## धडपड

जगणे जमत नसतानाही
जगतात इथे माणसे
मरणाची इच्छा नसताही
मरतात किती माणसे

भोवती दुःखाचे डोंगर
जगण्याचे दुःख मोठे
तरीही आनंद वाटतो
झेलतात कष्ट किती

त्यातही मनुष्य रमतो
भित्र्या माणसांना येते
कधी बळ दहा हत्तींचे
तेव्हा जिंदगी सोडताना

भय नच वाटे मृत्यूचे
गळफास मृत्यूला लावती
मागच्यास सर्व काळजीचे

८३.

## निर्धास्त

असतात निर्धास्त ते
कुणालाही देव बनवून
एखाद्याच्या माहात्म्याचं
स्तोम माजवून
एकदा देवाला
देव्हाऱ्यात बसवलं की..
समस्या सुटतात सगळ्याच!
की वाढतात फक्त गुंते...!
तेवढा विचार करतो कोण?
सगळेच असतात आपल्याच आवर्तात
कधी भक्तीच्या, कधी शक्तीच्या
कधी कधी युक्ती भुक्तीच्या
चक्रावून टाकतात विचार
निर्धाराच्या देवालाही
यांच्या भक्तीत देव
हरवतो स्वतःचे अस्तित्व
त्यांच्या भावनेत महात्मा
विसरतो स्वतःच्या भावना
आणि पुरवताना त्यांच्या कामना
स्व इच्छेच्या भोगतो यातना
कधी विटेवर, कधी गंगेवर
माणसे वसवतात स्वतःतील देवाला
आणि मोकळे होतात.. स्वतःला हरवायला

८४.

## कविता माझ्या मनीच्या

कविता माझ्या मनीच्या
लाटा घेऊन येतात
तरीही किनारा स्वस्थ
दंग किती बघण्यात
कधी कधी रात्रपक्षी
झाडाखाली उतरतो
माझ्या मनातले दुःख
नजरेने पीत जातो
बेदखल आसवेही
बांध डोळ्यांचे फोडती
मनातील भाव तेही
डोळ्यांतून उतरती

८५.

## आजकाल

आजकाल स्फोटांनी हादरतात फक्त इमारती
माणसे मरतात, पण गोठलेल्या रक्तांची
सळसळते रक्त अन् पेटलेले मन
आता असते, फक्त पुस्तकात, सिनेमात
माणसांची मने आता जगण्यासच विटलेली
शहरात होतात स्फोट अन् पेटतात मात्र गल्ल्या
गारद झालेले ढिगारे आक्रंदतात, पण
बाजूने घाईत जाणारे रुमाल लावून धावतात
रुळावरून धावणाऱ्या फास्ट लोकलसारखे,
त्यांच्याही पायांना असतात जणू चाके,
अन् लोकलसारखेच एक निर्जीव मनही
पुढारी येतात, भाषणे ठोकतात
घटकाभर देतात शिव्या आत्मघातक्यांना
नंतर बसते पंगत सुधारणावादी अन् धर्ममार्तंडांची एकत्र
खल करण्यासाठी, नुकसानीचा अंदाज घेण्यासाठी
त्यातही धर्मांचे झेंडे अन् नाती गोतीच पुढे येतात
पुनर्वसनाचे कंत्राट मात्र
आपल्याच सोयऱ्याला देण्यात माहीर असणारे
सत्तेकरी, आणि विरोधकही
गप्प बसतात त्यांचे गळे लाचारीने आवळल्याने

८६.

## खळबळ

अथांग किनारा कवेत
नदी शांतच वाहते
कधीतरी लाटांचे
अचानक तांडव होते
किनाऱ्यावर वासनांचे
पीक उमलत जाते
झाडांतून पक्ष्यांचे
रात्रीस कूजन चालते
रेतीतल्या रेघा अन् चित्रे
जिवंत होतात, चालतात
किनारे बिथरतात, मग
वाऱ्यांचे श्वास रोखतात
कुणी प्रेमगीत गातात
केविलवाण्या स्वरात
खळबळ माजते तशी
नदी-लाटांच्या ऊरात

८७.

## शिक्षा

रस्त्यांमागे गावे
धावतात कधीकधी
धडपडतात मग रस्ते
गावाबाहेर जाण्यासाठी
तसे रस्ते केविलवाणे
हकालपट्टीनंतर
जातात दूर रानोमाळ
पिकांना हटवितात
भोवताली गाव वसले की
रस्त्याला हटविले जाते
ही शिक्षा असते जणू
रस्त्यालाच
पिकांना हटविल्याची

८८.

## आपलेच भागत नाही

घराच्या अंगणात
चिमण्या येतात
मनात घर करतात
काही उडून जातात ।।१।।

चिवचिव करणाऱ्या
चिमण्यांचे आर्त बोल
घुमत राहतात सदा
मनाच्या कुडीतदेखील ।।२।।

गच्चीतल्या कुंडीतल्या
मुळांशी त्यांची खुडबुड
जगण्याचे मूळ सर्व
शोधण्याची धडपड ।।३।।

घराच्या अंगणामध्ये
गुरांची वर्दळ
मिळे का चारा-पाणी
मनातली तळमळ ।।४।।

अर्थ नच कळे त्यांना
मारतात उगा लोक
गुरे हंबरती किती
त्यांची अधुरीच भूक
चारा कुठे मिळतो
मनी काहुरते भीती
परी उरातल्या क्षुधेला
त्यांची कुठे वाटे क्षिती ।।५।।

चिमण्याची व गुरांची
आता वर्दळ थांबली
मनाचीही गती तिथे
जागेवर थांबली।।६।।

जाहले अंगण रिते
मनातही काही नाही
दानतीचे कुठे कोणा
आपलेच भागत नाही।।७।।

८९.

## सही सही

बैलांनी पोळ्यालाच सजायचं फक्त
कौतुक करून घ्यायच मस्त
घ्यावी येईल ती झूल
न् मिरवायंच झालं
वर्षभर राबवायची माणसांची
हीच चाल बैल बघत असतो
आम्हीही तसेच पोळ्याची वाट बघतो
असंच काही नसतं, आमचा पोळा
रोजचं येतो नित्यनेमानं
फक्त निमित्त वेगळी
त्यांची राबवायची खेळी
कधी वाढदिवस तोही तीनदा
दाखल्यावरचा, तिथीचा आणि
इंग्रजी कॅलेंडरवरील तारखेचा
बोनस मुलांच्या वाढदिनाचा
बायकोचाही वाढदिवस
थाट मात्र आमचा
बैलांच आपलं खूप बरं असतं
त्यांची भिस्त मालकावरच
आमचं मात्र तसं नसंत
बैलाचं निभवायचं पात्र
मालकही आम्ही, बैलही आम्ही
सजायचही आम्हीच
दोन्हीकडे काम फत्ते हवं
अगदी सही सही

९०.

## डोळे

काळोखाला हळूहळू
चटावतात डोळे
सरावत जातात
पाण्यालाही मग कावळे
अंकुरही वळवळतात
चार सडाके पडले की
नजरांना चटक
लागते काळोखाची
गात्रांना मात्र ओढ
प्रखर उजेडाची
बिलगतात देह
काळोखात घट्ट
चालू असते केवळ
डोळ्यांची उघडमीट

९१.

## झाला मोकळा बाजार

विश्वाचे उघडे दार
झाला मोकळा बाजार
खुल्या विश्वात घुमाया
सारे व्यापारी तयार

तसे पूर्वीसुद्धा काही
होते व्यापारी फिरत
गावोगावी बाजारात
माल त्यांचा खपवत

बहुराष्ट्रीय कंपन्या
पसरल्या चहुकडे
आहे मोडलेले पार
स्थानिकांचे कंबरडे

आली मंदीची ही लाट
झाले युवक बेकार
त्यांच्या हाती खूप पैसा
ज्यांचा फुलला बाजार

अशी भेदाची ही दरी
आहे अति रुंद झाली
गिऱ्हाईका लुबाडणे
हीच नवी रीत झाली

झटपट श्रीमंतीचे
त्याने किलकिले दार
नव्या वाटा चोखाळता
किती सहज व्यवहार

जीवघेण्या स्पर्धेत या
नसे धाक कुणालाही
पैसा मिळतो चिक्कार
स्फोटातल्या प्रेतालाही

ज्याच्या हाती सत्ता, पैसा
त्याची मनमानी फार
भावनांचा झाला आता
येथे खुला व्यवहार

झाले असे खुले जग
जागतिक व्यापाराने
टाकलेली येथे मान
मात्र देशी उद्योगाने

पकडण्या ग्राहकांना
योजनांचा भडीमार
एका एका रुपयाला
लुटण्याला सामान्याला
झाला डॉलर लाचार

९२.

## शहर

कर्फ्यू लागल्यागत आता
उगीच भासते शहर
चांदण्यांची चिडीचूप
फुलांचा रुके बहर


पदरव माझा मला
कशासाठी थांबवतो?
निष्पर्ण झाडाला मग
कसा हुंदका फुटतो

शहर हे एरव्हीचे
असे किती मस्तवाल
आता सारी सामसूम
सुन्न झाला भवताल

रानजाईचे ते झाड
अवसेला फुलारते
भयाण त्या अंधाराला
कशासाठी पुकारते?

चांदण्याही उतरल्या
का जाईच्या झाडावर
आभाळही आनंदाने
झुकवतेय नजर

# स्त्री जाणिवेच्या कविता



९३.

## इमान

समुद्राला अर्ध्यावर सोडून
किनाऱ्याकडे धावणाऱ्या
लाटांसारखं
प्रेम करणाऱ्या बाया
फुलातल्या गंधासारखे पुरुष
वाऱ्याच्या संगे कळ्या धावत सुटतात
आणि फुले मात्र झाडांशी
इमान राखून घट्ट राहतात

९४.

## ती

ती रडते तेव्हा भार तयांचा घेते
ती हसते तेव्हा मनात कष्टी असते ।।१।।

नजरेत तिच्या धाक भयाचा
फुलते तरी मनी  घायाळ असते ।।२।।

आयुष्य असे वैराण कसे
शंकित, पण हिरवे असते ।।३।।

भवती कसे दिसती ठसे
रुसत भावना मनी असते ।।४।।

उठते काहूर, बनते एक डर
तरीही पुन्हा ती फुलत असते।।५।।

अंकुरते सुख पुन्हा रुजते
तनाच्या भुईत वसत असते।।६।।

९५.

## तिचा हक्क

लहानपणी मी पाहिलं माझ्या आईला
जात्यावर दळताना
ऐकल्या कहाण्या
कायं होतं दळताना

बाया म्हणे पहाटे उठंत
सडा सारवणं करत अंगण फुलवत
अन् दळायला बसत जातं घेऊन

पसा पसा दुःख सुपातलं
जात्यात जाई  अन्
त्याचं पीठ पडे

सुपातले हसंत जात्यातल्यांना
पण त्यांच्या गावी नसे
भरडून घेण्याची वेदना

पाळी आली दुसऱ्याची की कळते
अन् उराशीच जपत
कशी बशी जळते

बाईचं सुखही तसंच होतं
घरधन्याच्या पायापाशी
दुःखाचं गाठोड मात्र कायमचं उशाशी

जात्याच्या पाळूसारखी तिची काया
अन् अंगभर पसरे पिठासारखी
तिची अंगभर माया

तिच्या पदरातलं सुख घरंगळे
तेव्हा सुखाला वाटलं
दुःख काढतंय गळे

घराच्या उंबऱ्यावर तिचाच हक्क
फक्त रांगोळी काढण्यापुरता
रांधण वाढणं चुलीवरती हक्क तेवढ्यापुरता

९६.

## सारेच अजब

अवघे विश्वच कुडीत समावून घेणाऱ्या कृष्णा
तुझी करंगळी कापलीच कशी अन्
माझ्या चिंधीने तू बांधली हेही अजबच
त्या चिंधीची परतफेड करण्यासाठी
अवघ्या विश्वाची वस्त्रे तू पुरवलीस
माझी लाज राखण्यासाठी तेव्हा...
असं पण आज... इथे सारेच दुर्योधन, दुःशासन
लोक म्हणतात पांडव आजही हतबलच झालेले
तू मात्र कुठे दडला आहेस कोण जाणे
त्या अवघडल्या अवस्थेत दुष्ट सारे
माझ्या अवघड जागेला भेदून त्यांनी
लोहदंड अख्ख्या विश्वजननाच्या
चिंध्या करणारे खुपसले ... तरीही
तू हरी हरी माझीच अब्रूच सारी
तुझे अबोलणे, मूक साक्षी होणे
आताही अजबच वाटते आहे..
ती द्रौपदी तेवढी तुझी लाडकी
आणि आता माझी अब्रू तूच ना
पाडलेली उघडी... सारेच अजब?
विश्वास कुणावर ठेवावा, हा प्रश्नच
सारेच पुरुषार्थ त्यांचे फक्त लुटणारे हात
दाखवतात असुरी प्रताप,
आता ही प्रतारणा युगेयुगे फक्त द्रौपदीची

कुंती, माद्री आणि स्वतःच डोळेझाक करीत
उघड्या मनाने माझा ऱ्हास पाहणारी
गांधारीही... ती हतबल किती?
आज मात्र कृष्णासारखा तूच समाजात
प्रकटला सहस्र, लाखो आवाजात
पण... अजूनही द्रौपदी कण्हते आहे...
न्याय आंधळा हतबल, व्यवस्था
सारेच अजब... अनाकलनीय...
लज्जेची वस्त्रे त्यांनी आता फेडून टाकलीत माझी
अगदी निर्लज्जपणे, क्रूरपणे आणि माझे अश्रू
त्यांना वाहण्याचेही भान नाही, जखमा अजून भळभळताहेत
त्यांवर तू फुंकर घालणारयेस कधी.. कळत नाही
खरंच सारं काही अजब, तुझ्या त्या आणि या दुनियेतही

# क्षीरसागरांची कविता = एक रसास्वाद

'सौंदर्यवाद' ही संकल्पनाच अस्तित्वात नव्हती त्याही काळात 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी' म्हणणारे कवी होतेच. त्र्यंबक बापूजी ठोमरे 'बालकवी', मंगेश पाडगावकर, ना.धो.महानोर, प्रकाश होळकर यांनी मराठीतील निसर्गकवितेला समृद्ध बनविले आहे. क्षीरसागरांची कविता निसर्गातील लोभस वर्णनात गुंतत गेली आहे. त्यांच्या कवितेत निरागस अशा निसर्गचित्रांची गॅलरीच उघडलेली दिसेल. माती ही सृजनात दंग असते. क्षीरसागरांना ही माती कृषीच्या सत्रात दंग झालेली दिसते. किंबहुना त्यांच्या कवितेतील मातीला जे डोहाळे लागले आहेत ते सृजनोत्सव साजरा करण्याचे. त्यासाठी तिच्या सोबतीला पाऊस येतो.

**– आशा मणगुतकर**

कविता हा मनातील भावनांचा सहजस्फूर्त आविष्कार असतो. जितक्या सहजपणे कळीचे फूल होते, घन ओथंबून आले की पावसाला सुरवात होते. तितक्याच सहजपणे कवीचे चिंतन शब्दांतून कवितेत व्यक्त होते. एकूण क्षीरसागरांची ही कविता म्हणजे त्या त्या क्षणीच्या भावनांची अभिव्यक्ती आहे. कधी केवळ भावना, कधी भूतकाळाच्या आठवणी, तर कधी तात्कालिक प्रतिक्रिया असे या कवितांचे स्वरूप आहे. या कवितेचे स्वरूप हे सामान्यतः वेळोवेळी झालेली मनातील भावनांची अभिव्यक्ती असं आहे.

**– प्रा. अरुणा गानू**

कविता सर्वसामान्य व सर्वमान्य वळणे गिरवतात. अनलंकृत, प्रासादिक, सुबोध व साधी सरळ शब्दरचना हे त्यांचे वैशिष्ट्य सांगता येईल. समाजसंस्कृती पर्यायाने मानवी आचारविचारांतील विसंगती, विद्वेष हे कवीचे चिंतनाचे विषय बनले आहेत. मुळातून आस्वादावी अशी ही कविता आहे. चित्रणापेक्षा वर्णनपरतेच्या रिंगणात वावरणारी ही कविता आहे. तिला चिंतनपरतेची सखोल डूब लाभून ही कविता भविष्यकालीन

नव्या परिमाणांच्या क्षितिजापलीकडे झेपावेल, अशी शुभचिन्हे या कवितांत आढळतात. सृजनशीलतेचे गाणे गाताना स्वतःची नाममुद्रा उमटविणारी ही सुलक्षणी कविता आहे.

**– स्व. परेन शिवराम जांभळे** (ज्येष्ठ कवी) मुंबई

एक विसाव्या शतकाच्या संधीकाळात ग्रामीण परिसरातील लिहिते झालेले कवी आपल्या मातीची असलेली  नाळ कसोशीने जपताना दिसतात. भोवती असलेली भौतिक सुखे, मुक्त अर्थव्यवस्था आणि पाश्चिमात्य वारे या झंझावातात सैरभैर झालेले जगणे सांभाळत कविता रुजविण्याचे काम ही स्वातंत्र्योत्तर काळातील चौथी पिढी करीत आहे. मनाचे मराठीपण जपत सजगतेने लिहिणारा प्रकाश क्षीरसागर हा या चौथ्या पिढीतील एक आहे. प्रकाश क्षीरसागर याची ही हळवी परंतु प्रगल्भ कविता आशयाला समर्थपणे कवेत घेते जगताना त्याचे रितेपण आणि भरलेपण याचे चित्रण करणारी त्याची कविता आवेश प्रकर्षाने टाळते, हे वैशिष्ट्य.

**– नारायण सुमंत,**
पिंपळखुंटे, ता माढा व्हाया कुर्डूवाडी

मराठी कविता एकविसाव्या शतकात प्रवेश करतेय आणि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील दोन दशकात मराठी कविता विपुल प्रमाणात वास्तववादी झालीय, याचा प्रत्यय पुन्हा एकदा कवी प्रकाश क्षीरसागर यांच्या कवितांतून येतो.

कविता आत्मानुभूतीचा आविष्कार असतो. कवी प्रकाश क्षीरसागर यांची कविता गावाकडून शहराकडे आलीय.एकविसाव्या शतकात प्रवेश करणारी मुक्त छंदातील ही कविता असली तरी त्या कवितांमध्ये लयबद्धता आहे. त्या कवितांना स्वतःचे अस्तित्व आहे. या कवितावर कवी प्रकाश क्षीरसागर यांचा स्वतःचा प्रभाव आहे. मी कवी प्रकाश क्षीरसागर यांना त्यांच्या पुढील काव्यप्रवासासाठी शुभेच्छा देतो.

**– डॉ. सुनील सावंत,** मुंबई

प्रकाश क्षीरसागर गेली अनेक वर्षे विविध नियतकालिकांतून, काव्यवाचनाच्या कार्यक्रमांतून आपल्या कविता वाचक- श्रोत्यांपुढे ठेवीत आलेले आहेत. काव्यस्पर्धांतून पारितोषिके व सन्मान मिळवून त्यांच्या अनेक कवितांनी जाणकारांची मान्यताही मिळविलेली आहे. बहुतांश कवींवर असतो तसा मराठीतील एखाद्या विशिष्ट कवीचा किंवा एखाद्या विशिष्ट काव्यप्रवाहाचा प्रभाव त्यांच्यावर दिसत नाही. खरे तर समकालीन मराठी कवितेत कुठल्या घडामोडी होत आहेत, कुठल्या नव्या प्रवृत्ती-प्रवाहांची घुसळण होत आहे, यापासून ते अलिप्तच आहेत. आजची मराठी कविता नवतेच्या दुसऱ्या, तिसऱ्या की चौथ्या वळणावर आलेली आहे, याच्याशी त्यांना काहीच कर्तव्य नाही. कवी ज्या भाषिक काव्यपरंपरेत लिहोतो त्या काव्यपरंपरेचे डोळस भान कवीला असणे अत्यंत आवश्यक असले तरी परंपरेचे हे भान काही वेळा कवीला अनुकरणाचा मोह पाडू शकते. पण क्षीरसागरांची कविता या मोहापासून दूरच असलेली दिसते. या कवितेची वाटचाल स्वतःच्या वाटेने झाली आहे.

क्षीरसागर यांच्या कवितेचे आणखी एक वैशिष्ट्य जाणवते की, त्यांची कविता सर्वसामान्य रसिक-वाचकांना जवळची वाटावी, अशी आहे. आकलनसुलभतेमुळे सामान्य वाचकाच्या मनाला थेट भिडणारी आहे. क्षीरसागरांची कविता साध्या विषयांतून आशय शोधते पण हा आशय वाचकांना फार गहन किंवा सखोल वाटेल असा किंवा वाचकांना स्तिमित करणारा असतो, असे नाही. त्यामुळे त्यांची कविता फारशी गुंतागुंतीची किंवा दुर्बोध न ठरता वाचकांच्या मनाला सहज भिडू शकते. क्षीरसागरांची कविता मातीची, तिच्या सृजनोत्सवाची, तिला सर्जनशील बनविणाऱ्या पावसाची कविता आहे.

पण आधुनिकीकरणामुळे झपाट्याने बदणाऱ्या आजच्या जीवनात एकेकाळी मातीच्या सृजनोत्सवात रमणारा माणूस नाईलाजाने शहरांकडे धावू लागलेला आहे. आपल्या गावापासून, मातीपासून तुटू लागला आहे. मातीत रुजलेली स्वतःची पाळंमुळं उखडून ती कृत्रिम शहरी वातावरणांत रुजवणं ही क्षीरसागरांच्या कवीमनाला अस्वस्थ करणारी वेदनादायी होष्ट आहे,

**– डॉ. वासुदेव सावंत**, पणजी

काव्यपुरस्कार आणि आशयपूर्ण कवितांमुळे क्षीरसागर यांची काव्यप्रांतात बरीच ओळख आहे. नव-नव्या कल्पनांनी, प्रतिमांनी कवितेचं अंतरंग उकलण्याची प्रतिभा कविच्या हृदयात असल्यामुळे त्यांची कविता इथल्या मातीतल्या माणसांच्या अंतःकरणाचा समृद्ध उद्गार असल्याचे दिसून येते. कवी क्षीरसागर यांच्या कविता सूक्ष्म निरीक्षणक्षमता, संवेदनशीलता आणि प्रतिमासामर्थ्य यांच्या एकात्मभावामुळे आशयाच्या अंगाने समृद्ध होत जातात. त्यांचे जीवन ग्रामीण भागाशी जुळलेले असल्यामुळ ग्रामीण संस्कृती, ग्रामीण भाषा, शब्द, वातावरण इत्यादी भाव त्यांच्या कवितेतून प्रतिबिंबित होतात. अस्तित्वाच्या विविध पातळ्यांवरून जीवनाच्या स्पंदनांना उजागर करणारी त्यांची कविता जेव्हा सखीच्या सहवासात गुंतून जाते तेव्हा शब्द, भावना गंधित होऊन जातात.

प्रकाश क्षीरसागर यांची कविता अंतःसृष्टीचे चित्र रेखाटत माती आणि निसर्गाशी नाते सांगत सुख-दुःखाच्या मंथनातून आत्मनिष्ठेने व्यक्त झाली आहे. ती प्रत्येकाच्या हृदयाला संवेदनशीलतेने स्पर्श केल्याशिवाय राहत नाही.

**– सुरेश पाचकवडे,**

शिवदय, राऊतवाडी, अकोला 444005

प्रसिद्ध कवी, गजलाकार सदानंद डबीर यांनाही क्षीरसागरांची कविता भावते!